महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती

ई-मेल:-gmcamravati@gmail.com Website :- www.gmcamravati.org

जा.क्र.शावैमअ/जाहिरात/ वसतिगृह/४८९९ /२६ दि.२५ .०९.२०२६

प्रति,
मा. उपसंचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय, अमरावती.

विषय :- जाहिरात प्रकाशित करणेबाबत..

महोदय,

नविन बीएससी नर्सिंग महाविद्यालय उभारणेकरिता महाविद्यालय इमारत, वसतिगृह इमारत भाडेतत्वावर प्राप्त करणेकरिता सोबत जोडलेला जाहिरातीचा मसूदा जास्त खप असलेल्या अग्रगण्य वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात यावा. ही नम्र विनंती.

| | | |
|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नाव व दुरध्वनी व इमेल पत्ता | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती<br>Email:-gmcamravati@gamil.com Mob-९९०४८६८०५७ |
| २ | जाहीरातीची सूचना प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख | दि. २६ /०९/२०२६ |
| ३ | प्रसिध्दी करिता शिफारस करण्यात आलेले वृत्तपत्रे | जास्त खप असलेल्या राज्यस्तरीय अग्रगण्य एक मराठी व एक इंग्रजी वर्तमान पत्रामध्ये |
| ४ | किती वेळा प्रसिध्द करावयाचे आहे | एक वेळा |
| ५ | देयक प्रदान करण्याकरिता कोणत्या नावाने पाठविण्यात यावे | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा स्त्री रूग्णालय परिसर (डफरीन), अमरावती पिनकोड :- ४४४६०१ |

(डॉ.अनिल बत्रा)
एमडी. एलएलबी
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
अमरावती.

प्रत माहितीस्तव सादर :-

१. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
२. मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

महाराष्ट्र शासन

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती

ई-मेल gmcamravati@gmail.com Website :- www.gmcamravati.org

जा.क्र.शावैमअ/जाहिरात/ वसतिगृह/ ४८९९ /२६ दि. २७ .०९.२०२६

### जाहिरातीचा मसूदा

नविन शासकीय बीएससी नर्सिंग अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता महाविद्यालयाकरिता ऑफिस व व्याख्यान कक्ष व प्रयोगशाळेकरिता जागा इत्यादी व ८० क्षमतेचे मुलींचे वसतिगृह व २० क्षमतेचे मुलांचे वसतिगृह भाडेतत्वावर घेण्याकरिता स्वतंत्र इमारतींची आवश्यकता आहे. इमारत भाडेतत्वावर घेण्याकरिता इच्छुक पुरवठादारांकडून आवेदन अर्ज मागविण्यात येत आहे. सविस्तर जाहिरात अटी व शर्तीसह या संस्थेच्या www.gmcamravati.org व संचालनालयाच्या www.med.edu.in या संस्थेवर उपलब्ध आहे.

(डॉ. अनिल बत्रा),
एमडी. एलएलबी.
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती

जावक क्र. ४८९९
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
अमरावती.

## -: जाहिरात :-

दि.२५/०९/२०२६

नविन शासकीय बीएससी नर्सिंग अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता महाविद्यालयाकरिता ऑफिस व व्याख्यान कक्ष व प्रयोगशालेकरिता जागा इत्यादी व ८० क्षमतेचे मुलींचे वसतिगृह व २० क्षमतेचे मुलांचे वसतिगृह भाडेतत्वावर घेण्याकरिता स्वतंत्र इमारतींची आवश्यकता आहे. करिता खालील प्रमाणे इमारती उपलब्ध असणाऱ्या आवेदकानी अर्ज सादर करावा.

१. बीएससी नर्सिंग महाविद्यालय करिता १०० विद्यार्थी क्षमतेचे व्याख्यान कक्षे, प्राचार्य यांचे कक्ष, विभागप्रमुख कक्ष, कार्यालयीन कामकाजकरिता कार्यालय, प्रयोगशाळा करिता, संगणक कक्षाकरिता, मल्टीपरपज हॉल इत्यादी सुविधा असलेली शक्यतो ३८६८० स्केअर फीट जागा.
२. बीएससी नर्सिंग वसतिगृह करिता ८० विद्यार्थीनी (मुलींचे)
३. २५ ते ३० विद्यार्थी क्षमतेचे (मुलांचे) वसतिगृह,
वसतिगृहात अभ्यागत कक्ष, वाचनालय, भांडार, डायनिंग हॉल, किचेन, गृहपाल कक्ष, विश्राम गृह इत्यादी सोयी सुविधा युक्त वसतिगृहाची आवश्यकता आहे.

वरील प्रमाणे इमारती शासन मान्यतेच्या अधिन राहून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुल्यांकनानुसार भाडेतत्वावर घेणे अत्यंत आवश्यक आहे. तरी इच्छुक मालक व्यक्ती/संस्थांनी मालकी हक्कांची कागदपत्रे, बांधकाम आराखडा, इमारतीचा पत्ता, खोल्यांची संख्या, उपलब्ध सोयी, सुविधा, फर्निचर, प्रांगण, इमारत व इतर कायदेशीर कागदपत्रे तसेच आतील फोटो सहीत सर्व कागदपत्रे जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून दि.०७.१०.२०२६ या कालावधी पर्यत gmcamravati@gmail.com या ईमेलवर किंवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे प्रत्यक्ष अर्ज सादर करावा. तसेच या बाबतची आवश्यक कागदपत्रे, अटी व शर्तीची यादी संचालनालयाच्या www.med-edu.in व महाविद्यालयाचे संकेतस्थळ www.gmcamravati.org या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

**दि. ०७ .१०.२०२६ नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

**सदर इमारत भाड्याने घेण्यासाठी खालील अटींची पुर्तता होण्याची आवश्यकता आहे.**

**अटी व शर्ती :-**

१. इमारत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती या संस्थेच्या जिल्हा स्त्री रुग्णालय, श्रीकृष्ण पेठ या जागेपासून जवळ असावी तसेच शक्यतो २ कि.मी.च्या अंतरावर असलेल्या इमारतींस प्राधान्य दिले जाईल.
२. वसतिगृहातील इमारतीत खोल्यांची (रुम) संख्या (०२ ते ०३ विद्यार्थी प्रतिरुम क्षमतेप्रमाणे) असावी.
३. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या/ महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठ, नाशिक यांच्या मानकांची पूर्तता करण्या योग्य महाविद्यालयाकरिता जागा, वसतिगृह/निवासस्थान उपलब्ध असणे आवश्यक आहे.
४. सदरील इमारतीमध्ये नियमित पुरेशा प्रमाणात शुध्द पिण्याचे पाणी व वापरण्याचे पाणी, सांडपाणी व्यवस्थापन व स्वच्छतागृहे व सुरक्षा रक्षक खोली, इ. असावे. आणि वार्डन कक्ष असणे त्याला लागूनच टायलेट-बाथरूम असावे.
५. विद्युत पुरवठ्याची व सिलिंग फॅन्स व विद्युत बल्ब/ट्युबची संपुर्ण व्यवस्था असावी.
६. इमारतींतील विद्युत वायरिंग ही जड विद्युत उपकरण लावण्या योग्य असावी.
७. इमारतीच्या आवारात वाहनांच्या पार्कीगसाठी पुरेशी जागा असावी.
८. इमारत ही ३ मजल्यापेक्षा जास्त असल्यास तेथे उद्वाहनाची सोय आवश्यक असावी.
९. इमारत ३ वर्षे किंवा या संस्थेचे पुढील आदेश होईपर्यत अथवा नवीन इमारत भाड्याने घेई पर्यत अथवा या संस्थेची नवीन इमारत तयार होईपर्यत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत इमारत भाडे करार तत्वावर घेणे आहे.
१०. घरपट्टी व इतर अनुषंगीक कर भरण्याची जबाबदारी ही इमारत मालकाची राहील.

११. पाणी, विद्युत (शासकीय नियमाप्रमाणे विजेचे डिपोजिट वजा करुन) देयके या संस्थेमार्फत अदा करण्यात येतील. जूने पेडींग बिला संबधित या कार्यालयांची जबाबदारी राहणार नाही.

१२. इमारत ताब्यात घेतल्याच्या दिनांकापासून ताब्यात असलेल्या जागेमधील विद्यूत वापराच्या देयकाची भरणा या संस्थेकडून करण्यांत येईल.

१३. इमारती संबंधीची आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. (इमारतीचा मंजुर नकाशा, ७/१२ उतारा, बांधकाम पुर्णत्वाचा/भोगवटा दाखला, विद्युत देयक, महानगरपालिका कर पावती, इमारतीचे फोटो, इ.)

१४. इमारतीचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांनी निर्धारित / निश्चित केल्याप्रमाणे शासकीय नियमानुसार अदा करण्यात येईल.

१५. वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीच्या सुरक्षेच्या दृष्टीने इमारत पूर्णता सुरक्षित, सर्व खिडक्यांवर तसेच बाल्कनीवर सुरक्षा ग्रिल व मच्छरजाळी, तसेच संरचानात्क, परिरक्षण व विद्युतप्रतिबंधात्मक, अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना केलेली असावी.

१६. इमारतीचे स्थानिक कर अधिक जीएसटी/सोसायटी देखभाल (Maintenance) हे इमारत मालक यांना अदा करावे लागेल.

१७. इमारतीमध्ये सर्व विद्यूत संबधीत व लहान, मोठी दुरुस्तीचे कामे तसेच नुतनीकरण करण्याची जबाबदारी इमारत मालकाची राहील व त्याकरीताचा खर्च इमारत मालकास स्वत: करावा लागेल व त्याची प्रतिपूर्ती या कार्यालयाकडून होणार नाही.

१८. इमारतीचे भाडे शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतरच इमारत मालकास अदा करण्यांत येईल.

१९. संस्थास्तरावर गठीत केलेल्या समितीद्वारे इमारतींची संपुर्ण पाहणी करुन समितीच्या अहवालानुसार इमारत भाडयाने घेण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

२०. सदर इमारती भाडयाने घेण्यासंबंधी सुरक्षा ठेव अदा करण्यात येणार नाही.

२१. इमारत भाडयाने घेण्यासंबंधीचे आदेश निर्गमित करण्याचे अथवा प्रलंबित ठेवण्याचे अथवा कोणत्याही वेळी पुर्व सुचना न देता आदेश रद्द करण्याचे तसेच जाहिरात रद्द करण्याचे अधिकार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांनी राखुन ठेवलेले आहे.

२२. भाडेतत्वावर इमारती घेण्याचा करार शासन मान्यतेच्या अधीन राहील.

२३. उपरोक्त अटी व शर्ती या शिथिल करण्याचा अधिकार हा मा. अधिष्ठाता यांनी राखून ठेवला आहे.

२४. अटी व शर्ती चे पालन न झाल्यास तसेच मा. अधिष्ठातांनी सांगितल्याप्रमाणे दुरूस्ती न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता यांना राहतील.

( डॉ. अनिल बत्रा )

**एमडी. एलएलबी.**

अधिष्ठाता,

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती.